# कासारवडवली वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

| महाराष्ट्र पोलीस | पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर<br>तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)<br>दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६<br>Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in | स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव |
|---|---|---|

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ २७८ /२०२४ दि. २६/१०/२०२४

**–: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–**

**ज्याअर्थी, कासारवडवली** वाहतूक उपविभागाचे हद्दीत MMRDA मार्फत मे. जे. कुमार इन्फ्राप्रोजेक्ट लि. कंपनी कडून मुंबई मेट्रो ४ चे काम करण्यात येणार आहे. कासारवडवली ते भाईदरपाडा येथे उड्डाणपुलाचे कामामुळे मुख्य दोन्ही वाहिनीवर वाहतुकीकरीता एकच लेन उपलब्ध आहे. सदर ठिकाणी पावसामुळे मुख्य रस्ता व सर्व्हिस रोडवर खड्डे पडून पूर्णपणे खराब झालेला आहे. कासारवडवली ते गायमुख पावेतो मेट्रोचे तसेच कासारवडवली व भाईदरपाडा येथे उड्डाणपुलाचे काम चालू असल्याने वाहतूक कोंडी होऊन नागरिकांची गैरसोय होत आहे. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी, मी, पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर म्हणून,** मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम. व्ही. ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** १) ठाणे घोडबंदर वाहिनीवरील सर्व्हिस रोडने नागलाबंदर सिग्नल कडून ओवळा सिग्नल कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **नागलाबंदर सिग्नल, आदर निवास, रूमाबाली सोसायटी, विहंग व्हॅली, द ब्ल्यु रूफ क्लब कट, ओवळा सिग्नल** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** ठाणे घोडबंदर वाहिनीवर ओवळा सिग्नल ते नागलाबंदर सिग्नल पावेतो सर्व्हिस रोडने घोडबंदर दिशेने जाण्यासाठी एक दिशा मार्ग केल्याने सदर रस्त्यावरून ओवळा सिग्नल कडे जाणारी वाहने नागलाबंदर सिग्नल येथून यु टर्न घेऊन इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) घोडबंदर ठाणे वाहिनीवरील सर्व्हिस रोडने ओवळा सिग्नल कडून नागलाबंदर सिग्नल कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **ओवळा सिग्नल, श्रीराम हॉस्पिटल बस स्टॉप कट, सीएनजी पंप** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** घोडबंदर ठाणे वाहिनीवर नागलाबंदर सिग्नल ते ओवळा सिग्नल पावेतो सर्व्हिस रोडने ठाणे दिशेने जाण्यासाठी एक दिशा मार्ग केल्याने सदर रस्त्यावरून नागलाबंदर सिग्नल कडे जाणारी वाहने ओवळा सिग्नल येथून यु टर्न घेऊन इच्छित स्थळी जातील.

सदर वाहतूक अधिसूचना कासारवडवली ते गायमुख पावेतो मेट्रोचे तसेच कासारवडवली व भाईदरपाडा येथे उड्डाणपुलाचे काम पूर्ण होईपर्यंत लागू करण्यात येत आहे. याबाबत काही हरकत अगर सूचना असल्यास त्या लेखी स्वरुपात पोलीस उप आयुक्त, शहर वाहतूक शाखा कार्यालय, तीन हात नाका, ठाणे ४००६०२ येथे पाठवाव्यात. याबाबत कोणाच्या काही हरकत अथवा आक्षेप प्राप्त न झाल्यास सदर अधिसूचना पुढील आदेश होईपावेतो कायम स्वरुपात अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सिजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

**( पंकज शिरसाट )**
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

CamScanner

**प्रत माहितीसाठी सादर** :–

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे
मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–५ वागळे इस्टेट व विशेष शाखा, ठाणे

**प्रत कार्यवाहीसाठी** :–

प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे
नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे

**प्रत** :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/– सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

**प्रत** :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे
२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी

**प्रत** :– संबंधित सपोआ वाहतूक विभाग, व संबंधित प्रभारी अधिकारी, वाहतूक उपविभाग, ठाणे शहर
२/– म.न.पा.ठाणे च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सूचना फलक लावून घ्यावीत.

CamScanner

नागलाबंदर सिग्नल




ओवळा सिग्नल ते नागला बंदर सिग्नल पर्यंत दोन्ही बाजूस सर्विस रोड (Oneway)